# राज्याचा कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणांकरिता सहाय्य

**(Support to State Extension Programme for Extension Reforms)**

## मार्गदर्शक सूचना सन २०१२-१३

### कृषि विस्तार कार्यक्रमाच्या योजनेची पार्श्र्वभुमी व ठळक वैशिष्टे/रुपरेषा :-

राष्ट्रीय कृषि धोरणांमध्ये कृषि विस्तारामधील क्रांतीकारक बदलाची गरज प्रामुख्याने समोर आली असल्याने कृषि विस्तार कार्यक्रमांना दिशा देण्याच्या दृष्टिकोनातून कृषि विस्तारासाठी विस्तृत रुपरेषा विकसित करण्यात आली आहे.

केंद्र शासनाने सन २०१०-११ मध्ये विस्तार कार्यक्रमाची मर्यादा वाढविली असून त्यामध्ये विशेष बाबींचा समावेश केलेला आहे. विस्तार कार्यक्रम सुधारीत योजनेमध्ये आवश्यक असणारे मनुष्यबळ व त्यासाठी आवश्यक असणारा निधी दिला आहे. सुधारीत योजनेत खालील मुख्य घटकावर विशेष भर दिला आहे.

- राज्यस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तरावर-पुनरुजीवित, नव्याने स्वायत संस्था स्थापन करणे.
- पब्लीक-प्रायव्हेट पार्टनरशिप अंर्तगत विस्तार सेवा पुरवठादारांचा समावेश व बहुउद्देशिय संस्थांना सर्व स्तरावर चालना देणे.
- शेतकर्यांेच्या गरजा व मागण्या विचारात घेऊन त्यानुसार शेतकरी समूह /शेतकरी गट (CIGs & FIGs) तयार करणे.
- विस्तार कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी करीत असतांना इतर कार्यक्रमासोबत सांगड घालण्यावर भर देणे.
- शेतकर्यांेच्या शेती मशागत पध्दतीने व अनुसरुन मोठया प्रमाणावर एकत्रित विस्तार यंत्र सामुग्रीचा वापर करण्यावर भर देणे.
- विस्तार कार्यक्रमामध्ये महिलांचा सहभाग वाढविणे, त्यासाठी महिला गट स्थापना करुन त्यांना प्रशिक्षण देणे.
- कृषि विस्तारची दिशा निश्चित करण्यासाठी लाभार्थीकडून सहभाग ग्राहय धरण्यात आला आहे.

आत्मा योजनेमध्ये प्रत्यक्ष कार्यक्रम अंमलबजावणीवर जास्त भर देणेत आला आहे. विशेषकरुन बॉटम-अप-प्लानिंग ऍप्रोच वर भर देण्यात आला आहे. कृषि विस्तारामध्ये शासकिय व अशासकिय संस्थांचा सहभाग, विस्तार कार्यक्रमात स्त्रियांचा सहभाग वाढविणे, कृषि संलग्न विभागाचा सहभाग वाढविणे इ.समावेश करणेत आला आहे.

गावस्तरावर शेतकरी मित्र व तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर विविध विस्तार कर्मचार्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये विस्तार सेवांचे योग्य मुल्यमापन आणि तंत्रज्ञान प्रसारण पध्दतींमध्ये गुणात्मक सुधारणा आणि सहज सोपेपणा यावर मुख्य भर दिला आहे. संशोधन तंत्रातील विकास आणि विस्तार सेवा या शेतक-यांच्या गरजा भागविणा-या असाव्यात यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

### योजनेची पार्श्र्वभुमी :-

सन १९९८ ते २००५ या कालावधित जागतिक बॅकेच्या निधीच्या सहाय्याने देशातील ७ राज्यातील २८ जिल्हयामध्ये राष्ट्रीय कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन प्रकल्पाअंर्तगत (NATP) तंत्रज्ञान विस्तारामध्ये नाविण्यपुर्णता (ITD) या सदराखाली विस्तार विषयक सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला. ही योजना अतिशय यशस्वी ठरली व राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणांकरिता सहाय्य ही योजना अस्तित्वात आली. ही योजना सुरुवातीस २५२ जिल्हयामध्ये विस्तारीत करणेत आली. सन २००७ साली राष्ट्रीय कृषि विकास परीषदेमध्ये कृषि विस्तारामधील क्रांतिकारक बदलाची गरज प्रामुख्याने समोर आली. राष्ट्रीय शेतकरी आयोगाने (National Policy for farmers) कृषि विस्तार यंत्रणेत अमुलाग्र बदल सुचविला आहे.

http://mahaagri.gov.in

सन २००५ ते २००९ या दरम्यान कृषि विस्तार कार्यक्रम सुधारणा अंर्तगत मिळालेल्या अनुभवातुन व राज्य सरकारशी सल्ला-मसलत करुन केंद्र शासनाने सध्याची राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणांकरिता सहाय्य ही योजना काही वैशिष्टयपूर्ण बदलासह प्रस्तावित केली आहे.

**आत्मा योजनेचा प्रमुख उद्देश :-**

राज्यस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तरावर पुर्नजिवीत, नव्याने स्वायत्त संस्था स्थापन करणे.

अनेक बहुउद्देशिय संस्थांना कृषि विस्तारासाठी चालना देणे व पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप अंतर्गत विस्तार सेवा पुरवठादारांचा समावेश करणे, शेती पध्दतीनुसार (Farming System) दृष्टीकोन, एकात्मिक व सर्वसमावेशक कृषि विस्तार कार्यक्रम राबविणे, विस्तार कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण करीत असतांना संलग्न विभागातील इतर कार्यक्रमासोबत सांगड घालणे. शेतकर्यांच्यागरजा व मागण्या विचारात घेऊन त्यानुसार शेतकरी समुह/शेतकरी गट (Farming System) तयार करणे.

वरील उद्देश साध्य करण्यासाठी संस्थात्मक व्यवस्था व त्यासाठी आवश्यक सर्मपित मनुष्यबळ यासाठी लागणारी आवश्यक तरतूद व निधीबाबतचे केंद्र शासनाने व राज्यशासनाने यशार्थदर्शी नियोजन केले आहे.

**<u>नियोजन व अंमलबजावणी राज्यस्तरावरील नियोजन व अंमलबजावणी</u> :-**

१) राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंर्तगत स्थापन करणेत आलेल्या राज्यस्तरीय (अधिकृत) अनुज्ञा समिती (SLSC) ची राज्य कृषि विस्तार कार्यक्रमांच्या नियोजनास मंजूरी आवश्यक आहे.

२) राज्यस्तरीय अनुज्ञा समितीच्या (SLSC) कामकाजासाठी आतंरविभागीय कार्यकारी गट (IDWG) आधारभूत असेल. आतंरविभागीय विभागीय कार्यकारी गटावर योजनेच्या दैनदिन समन्वय व व्यवस्थापनाची जबाबदारी असेल.

३) राज्य मुख्यालय कक्षातील राज्य नोडल अधिकारी व राज्य समन्वयक हे राज्यस्तरीय शेतकरी सल्ला समिती (SFAC) यांचे सहभागाने जिल्हयाचे कृषि विस्तार आराखडे संकलित करून राज्याचा एकत्रित आराखडा तयार करतील व सदरचा आराखडा केंद्र शासनास राज्यस्तरीय अनुज्ञा समितीची (SLSC) मान्यता घेऊन सादर करतील. राज्य नियंत्रण कक्ष आत्मा योजना अंमंलबजावणीचे संनियंत्रण करेल.

**सामेती स्तर-** विस्तार कर्मचार्यांच्या/कार्यकर्त्यांच्या क्षमता विकासासाठी वार्षिक प्रशिक्षणाचे नियोजन व कार्यवाही सामेती करेल. त्याबाबतचे प्रशिक्षण वेळापत्रक निश्चित करतांना सर्वांना प्रशिक्षण मिळेल व प्रशिक्षण गरजेनुरुप असेल याची काळजी घेईल.

**जिल्हास्तर नियोजन व अंमलबजावणी :-**

आत्मा ही एक स्वायत्त संस्था आहे. आत्मा नियामक मंडळ सर्वसमावेशक दिशादर्शक धोरण ठरवेल नियामक मंडळ, प्रकल्प संचालक आत्मा, प्रकल्प उपसंचालक, आत्मा व सहाय्यक कर्मचारी यांचे सहकार्याने कामकाज करतील.आत्मा व्यवस्थापन समिती (AMC) ही योजना अंमलबजावणीसाठी कार्यकारी शाखा असेल.जिल्हा स्तरावरील जिल्हा शेतकरी सल्ला समिती ही जिल्हा कृषि विस्तार नियोजन व अंमलबजावणीत मदत करेल यथार्थदर्शी संशोधन व विस्तार आराखडा (SREP) तयार करण्याबरोबरच जिल्हयातील संपुर्ण कृषि विस्तार व्यवस्थापन व नियोजन समर्पित कर्मचार्यांच्या मदतीने आत्मा संस्था करेल.

**तालुकास्तर नियोजन व अंमलबजावणी :-**

तालुकास्तरावर- तालुका/गट तंत्रज्ञान चमू (BTT) ज्यामध्ये कृषि व कृषि संलग्न विभागातील गट/तालुका स्तरावरील अधिकारी असतील गट शेतकरी सल्ला समिती (BFAC) ज्यामध्ये प्रगतशील व अनुकरणीय शेतकरी असतील, त्यांचे तालुका पातळीवरील कृषि विस्तार नियोजनामध्ये अत्यंत महत्वाचे स्थान असेल. गट शेतकरी सल्ला

http://mahaagri.gov.in

समितीत निवडलेले शेतकरी हे प्रामुख्याने शेतकरी/कृषि विज्ञान मंडळ, शेतकरी समुह यांचेतुन चक्राकार (रोटेशन) पध्दतीने निवडण्यात यावेत जे तालुका तंत्रज्ञान चमुस वेळोवेळी मार्गदर्शन करतील. तालुका आत्मा कक्षामध्ये तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक व विषय विशेषज्ञ हे BTT व BFAC च्या मदतीने तालुका कृति आराखडा तयार करणे व अंमलबजावणी संदर्भात जबाबदारी पार पाडतील.

**<u>गावस्तर नियोजन व अंमलबजावणी</u> :-**

१) शेतकरी मित्र हा कृषि विस्तार यंत्रणा व शेतकरी यांचेतील महत्वाचा दुवा असेल. प्रत्येकी दोन गावांसाठी १ शेतकरी मित्र निवडला जाईल. शेतकर्यांलना कृषि व कृषि संलग्न विभागाबाबत मार्गदर्शन करणेसाठी शेतकरी मित्र उपलब्ध असेल. शेतकरी, शेतकरी सेवा केंद्र इ. विस्तार कार्यक्रमांबाबत माहितीची देवाण-घेवाण करणे संदर्भात शेतकरी मित्राची मदत होईल.

२) ज्या ठिकाणी शक्य आहे तेथे कृषि व्यावसायिकांना तांत्रिक सहाय्य देवुन कृषि विस्तारामध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन द्यावे.

३) तालुक्यात कृषि व कृषि संलग्न विषयाच्या शेतीशाळा घेणेत याव्यात.

केंद्र शासनाने सन २०१०-११ मध्ये सुधारीत मार्गदर्शक सुचनानुसार नविन पदे भरण्यास मान्यता दिलेली आहे.

**१) राज्यस्तर-** राज्य नोडल कक्षामध्ये राज्य नोडल अधिकारी आणि सहाय्यक कर्मचारी असतील आत्मा योजनेअंर्तगत राज्यस्तरावर एक राज्य समन्वयक, कंत्राटी पध्दतीने भरण्यास मान्यता देणेत आली आहे. राज्य समन्वयक हे राज्य नोडल अधिकार्यांच्या संपुर्ण नियंत्रणाखाली कार्य करतील.

**२) सामेती-** नियमित राज्यस्तर,जिल्हास्तर, तालुकास्तर व गावपातळीवरील कृषि विस्तार कर्मचार्यांमच्या क्षमता विकास व प्रशिक्षणासाठी कार्यरत असणार्यात सामेतीसाठी या योजनेअंर्तगत अधिकचा कर्मचारी वर्ग मंजूर करणेत आला आहे. १ संचालक, ८ उपसंचालक (**Faculty**) व १-१ लेखा-नि-लिपीक- संगणक अज्ञावली रुपरेषक अशी एकुण ११ पदे मंजूर आहेत.

**३) जिल्हास्तर-** सुधारीत मार्गदर्शक सुचनानुसार प्रत्येक जिल्हयामध्ये खालील पाच कर्मचारी असतील तसेच आत्मा नियामक मंडळ व्यवस्थापन समिती बैठक घेण्याबरोबर जिल्हयातील कृषि विस्तार व्यवस्थापन सेवेची संपुर्णपणे जबाबदारी प्रकल्प संचालक (आत्मा) यांचेवर राहील. जिल्हास्तरावरील विस्तार कार्यक्रमाच्या बळकटीकरणासाठी प्रकल्प संचालक-१, प्रकल्प उपसंचालक-२, लेखा-नि-लिपीक-१, संगणक अज्ञावली रुपरेषक -१ पदे मंजुर आहेत.

जिल्ह्यामध्ये दोन प्रकल्प उपसंचालक पदे मंजूर आहेत. ते प्रकल्प संचालक आत्मा यांचे प्रशासकिय नियंत्रणाखाली काम पाहतील. प्रकल्प संचालक(आत्मा) हे आत्मा व्यवस्थापन समितीचे चेअरमन/अध्यक्ष म्हणुन कामकाज पाहतील.

**४) तालुकास्तर-** आत्मा योजनेअंर्तगत प्रत्येक तालुका/गटासाठी एक तालुका/गट तंत्रज्ञान व्यवस्थापकाचे पद कंत्राटी पध्दतीने मंजूर आहे. तसेच प्रति तालुका/गटासाठी दोन विषय विशेषज्ञांची कंत्राटी पध्दतीने कृषि व कृषि संलग्न विभागातील कृषि विस्तार सेवेकरीता पदे मंजूर आहेत.

**तालुकास्तरावर तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापकाची यांनी करावयाची कामे :- (BTM)**

१) सर्व कृषि संलग्न विभागात समन्वय साधणे.
२) बी.टी.टी. व शेतकरी मिटींगचे आयोजन करणे.
३) तालुका कृषि आराखडा तयार करणेसाठी बी.टी.टी.स सहाय्य करणे.
४) वेळोवेळी योजनेच्या प्रगतीचा आढावा घेणे.
५) वेळोवेळी बीटीटी व आत्मा यांना फिडबॅक देणे.
६) शेतकरी/शेतकरी समुह यांना कृषि संलग्न विभागाच्या मदतीने मार्गदर्शन करणे.

http://mahaagri.gov.in

७) शेतीशाळा घेणे.
८) शेतकरी समुह तयार करणे व त्यांच्याशी संवादाचे आयोजन करणे.
९) शेतकरी समुह व शेतकरी संघटना यांचे रेकॉर्ड जतन करणे.

**तालुकास्तरावर विषय विशेषज्ञ यांनी करावयाची कामे :- (SMS)**
१) विषय विशेषज्ञांचे कौशल्य क्षेत्र तालुका/गट परत्वे गरजेनुरुप वेगवेगळे असु शकेल.
२) तालुकास्तरावरील कृषि व कृषि संलग्न विभागातील अधिकारी आणि तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांचे सहकार्य व मार्गदर्शनाखाली विषय विशेषज्ञ, शेतकरी सेवा केंद्र व किसान कॉल सेंटर यांना मार्गदर्शन करतील.
३) तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापकांच्या तांत्रिक सहाय्याने विषय विशेषज्ञ आवश्यक तेथे शेतीशाळा, शेतकरी मित्र, शेतकरी समुह आणि शेतकरी यांना तांत्रिक व गरजेनुरुप मार्गदर्शन करतील.
४) तालुका स्तरावर तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापकास मदत करणे.
५) तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक हे प्रकल्प संचालक (आत्मा) यांचे प्रशासकिय नियंत्रणात कामकाज पाहतील. विषय विशेषज्ञ हे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांचे प्रशासकिय नियंत्रणात कामकाज पाहतील.

**प्रकल्प संचालक -**
१) राज्यस्तरावर राज्य नोडल अधिकारी व समिती, जिल्हास्तरावर कृषि संलग्न विभागाबरोबरच कृषि विज्ञान केंद्रे, पंचायत राज संस्था, खाजगी क्षेत्र आणि जिल्हा नियोजन एकके यांचेशी समन्वय ठेवुन कामकाज पाहवे.
२) वार्षिक जिल्हा कृति आराखडयास अंतीम स्वरुप देणे.
३) विस्तार विषयक सुधारणा, आर.के.व्ही.वाय. आणि एन.एफ.एस.एम. योजनांच्या प्रगतीचा आढावा घेणे.
४) आत्मा नियामक मंडळाच्या बैठका घेणे.
५) आत्मा व्यवस्थापन समीतीच्या बैठका घेणे.
६) जिल्हा स्तरीय समीतीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहणे.
७) तालुक्यांना वेळेवर निधी वाटपा बाबत कार्यवाही करणे.

**प्रकल्प उप संचालक** - संशोधनासंबंधी सर्व विषय व कार्य पार पाडतील.
**नव्याने नियुक्त करावयाच्या कर्मचा-यांची नियुक्ती पध्दत -**
**१)** राज्य समन्वयक (राज्यस्तर), तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक व विषय विशेषज्ञ (तालुकास्तर), संगणक अज्ञावली रुपरेषक (जिल्हास्तर व राज्यस्तर) ही पदे कंत्राटी/करार पध्दतीने एकत्रित मानधनावर भरणेत यावीत.
**२)** योजनेतील इतर पदे नियुक्ती/द्विनियुक्ती/प्रतिनियुक्तीने शासनाच्या अथवा संघटनाच्या अथवा खाजगी क्षेत्रातुन योजना कालावधीपर्यत भरणेत यावीत.उदा. प्रकल्प संचालक (आत्मा) प्रकल्प उपसंचालक (आत्मा) लेखा-नि-लिपीक (Accountant cum Clerk)
**३)** योजनेअंर्तगत दिलेल्या पात्रतेचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर आंतरविभागीय कार्यकारी राज्यस्तरीय अनुज्ञा समितीच्या मान्यतेने संबधित बाबतीत निकषांत बदल करु शकतात.

**शेतकरी मित्र**
- अत्यावश्यक, गरजेंनुरुप, गांवपातळी-पासूनचे (Bottom-up) नियोजन व विस्तार कार्यक्रम अंमबजावणीसाठी स्वयंप्रेरीत सेवाभावी वृत्तीचे प्रगतशिल शेतकरी हा शेतकरी मित्र निवडला जावा. जो कृषि विस्तार यंत्रणा व गाव/खेडे यामधील अत्यंत महत्वाचा दुवा असेल त्याने शेतीतील कौशल्य सिध्द केलेले असावे. तसेच इतरांस ते अनुकरणीय असावे.

http://mahaagri.gov.in

- शेतकरी मित्राची निवड तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक ग्रामपंचायतीच्या ठरावानुसार करतील, जेणेकरुन पंचायत क्षेत्रातील शेतकरी समुह/शेतकरी विज्ञान मंडळ यांचे तो संपर्कात राहील. किंबहुना त्यांचाच तो एकभाग असेल.
- त्याचे किमान शिक्षण माध्यमिक अथवा उच्च माध्यमिक स्तरावरील असावे.
- जर प्रगतशिल शेतकरी उपलब्ध झाले नाहीत तर आवश्यक लेखी तथा संवाद कौशल्य असल्यास शेतकरी मित्राची निवड करण्यास हरकत नाही.
- शेतकरी मित्राच्या क्षमता विकासासाठी प्रशिक्षण, शेतकरी सहल आणि विद्यापीठ प्रक्षेत्र भेट इ.साठी निधीची तरतुद करणेत आली आहे.
- प्रति दोन गावाकरीता एक शेतकरी मित्र निवडण्यात यावा.
- प्रति शेतकरी मित्र/प्रति वर्ष ४०००/-रुपये त्यांच्या जबाबदारी पार पाडतांना मोबदला वस्तु स्वरुपात (Mobility Charges) मिळेल.
- जास्तीत जास्त महिलांची शेतकरी मित्र म्हणुन निवड करणेत यावी.

**शेतकरी मित्र कार्य :-** शेतकरी संघटन/शेतकरी समुह तयार करणे
- शेती प्रात्यक्षिके, किसान गोष्टी राबविण्यास मदत करणे व गावपातळीवरील संशोधन विस्तार कृषि नियोजनास मदत करणे.
- कृषि व कृषि संलग्न विभागाअंतर्गत गांवपातळी वरील माहिती बाबत विषय विशेषज्ञ यांचेशी संपर्कात राहणे.
- ग्रामसभेस हजर राहणे व दैनदिनी ठेवणे.
- प्रसार माध्यमांच्या मदतीने माहिती देणे.
- बीटीटी/शेसस/बीटीएम/एसएमएस यांनी दिलेले काम करणे.

**राज्यस्तर**

१) पायाभुत सुविधासाठी (Infrastructure support & upgradation) सामेतीस या योजनेनुसार खालीलप्रमाणे अधिकचा निधी देणेत येत आहे. १०० ते ४०० तालुके असतील तर-१ कोटी/सामेती हा निधी सिव्हिल/इलेक्ट्रानिक आणि इतर आवश्यक पायाभुत संविधांसाठी देणेत येत आहे.

तथा आवश्यक तेथे वाहन भाडयाने घेणे, वाहन उपलब्ध असल्यास पेट्रोल,ऑईल, लुब्रीकेटस् व इतर खर्च यासाठी निधी देणेत आलेला आहे.

२) मानव संसाधन विकास (HRD)- सामेती, कर्मचार्यांच्यागरजेनुरुप, नियमीत क्षमताबांधणी कार्यक्रम राष्ट्रीय कृषि विस्तार व्यवस्थापन संस्था (मॅनेज) हैद्राबाद व राष्ट्रीय कृषि संशोधन परीषद, नवी दिल्ली यांचे समन्वयाने तसेच कृषि व सहकार मंत्रालयाने मदत केलेल्या विस्तार शिक्षण संस्था, स्थानिक कृषि विद्यापीठे यांचे मदतीने करेल.

राज्यार्तगत कृषि व कृषि संलग्न विभागातील कर्मचार्यांच्या क्षमता विकास कार्यक्रम सामेती व कृषि विज्ञान केंद्र यांचे मदतीने ठरविता येईल.त्याचबरोबर या योजनेअंतर्गत मॅनेज, हैद्राबाद तर्फे दुरशिक्षा/टपालाद्वारे मोहीमेअंर्तगत कृषि विस्तार व्यवस्थापना संदर्भात पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमही पुर्ण करता येईल.

३) कॅफेटेरीयामध्ये संनियंत्रण व मुल्यमापन ,कृषि प्रदर्शन, प्रादेशिक प्रदर्शने किसान एक्स्पो, शेतकर्यांना बक्षिसे इ.चाही समावेश करणेत आला आहे.

**जिल्हा तालुकास्तर**

जिल्हा/तालुका स्तरावर कामाचे विभाजन खालील तीन गटामध्ये होईल.

१) शेतकरी केंद्राचा कार्यक्रम.

२) शेती माहिती प्रसार कार्यक्रम.

३) संशोधन - विस्तार - शेतकरी जोड कार्यक्रम.

http://mahaagri.gov.in

शेतकरी केंद्रीत कार्यक्रमामध्ये SREP तयार करणे विकसित करणे, शेतकरी प्रशिक्षण/प्रक्षेत्र आयोजन करणे, शेती प्रात्यक्षिकांचे आयोजन करणे. जेणे करुन शेतकरी सक्षम होईल तसेच तंत्रज्ञान प्रसार प्रक्रियेमध्ये सहभागी होईल.

शेतकरी माहिती प्रसारण, स्थानिक कृषि प्रदर्शने, प्रिंटेड साहित्यातुन आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या माध्यमातुन कृषि विस्तार साधला जावा.

संशोधन- विस्तार- शेतकरी जोड (Linkage) कार्यक्रमामध्ये स्थानिक पातळीवरील शेतकरी- शास्त्रज्ञ मंच संवाद, शेतीदिन आणि किसान गोष्टीचे आयोजन आणि स्थानिक पातळीवरील संशोधनात्मक विषयांचा समावेश होतो. ज्यांचा SREP मध्ये उल्लेख केलेला आहे.

**कॅफेटेरियानुसार मार्गदर्शक सुचना**

जिल्हास्तरिय कार्यक्रमांमध्ये नियोजनामध्ये ५५% संसाधन शेतकरी केंद्रीत कार्यक्रमासाठी वापरले जावेत. १०% शेती माहिती प्रसारणासाठी, ७% संशोधक-विस्तार-शेतकरी जोड कार्यक्रमासाठी वापरले जावेत.प्रशासकीय खर्च ज्यामध्ये प्रवास खर्च/दैनिक भत्ता, वाहन भाडयाने घेणे, पेट्रोल, ऑईल आणि विक्रीकर खर्च, जिल्हास्तरावरील/ तालुकास्तरावरील आकस्मिक खर्च मर्याद २८% पेक्षा जास्त असु नये. तथापि २८% मर्यादेमध्ये कर्मचारी वेतन घटक गणला जावू नये (Specilist & Functionary Support) राज्य सरकारने अंदाजपत्रकीय गरजेनुसार मनुष्यबळ सहाय्य आणि संभाव्य मानधना बाबत तपशिल तयार करावा. प्रशासकिय बाबी अंतर्गत बचत/शिल्लक कॅफेटेरियातील इतर घटकांसाठी उपयोगात आणली जावू शकतो. परंतु इतर घटकांतर्गत शिल्लक प्रशासकिय कार्यासाठी वापरण्यात येवू नये. मार्गदर्शक सुचनांमधील नॉर्मस मध्ये अत्यावश्यक घटकांर्गत व लेखी कारणासह आत्मा नियामक मंडळ एकुण प्राप्त निधीच्या जास्तीत जास्त १०% पर्यंत बदल करु शकते. असे सर्व घटक पुढील वर्षाच्या नियोजनासाठी देणेस यावेत जेणे करुन आवश्यक मार्गदर्शक सुचना जारी केल्या जातील. राज्य सरकारने दिलेल्या नॉर्मस/सेंलिंग मध्ये कृषि व सहकार मंत्रालयाच्या पूर्वपरवानगीने १०% पर्यंत बदल करु शकते.

**आयसीटी, कनेक्टीव्हीटी आणि मोबीलीटी**

सुधारित आत्मा कॅफेटेरियामध्ये माहिती संभाषण तंत्रज्ञान वापरण्यावर जास्त भर देणेत आला आहे.

शेतकरी शेतकरी समुह यांना तातडीने माहिती पुरविणेसाठी/देणेसाठी राज्य कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र, बी.टी.एम आणि एस.एम.एस. तालुकास्तरावर मोबाईलच्या माध्यमातुन उपलब्ध असतील.

हवामानाबाबत सुचना, किड व रोग नियंत्रणाबाबत मार्गदर्शन आणि इतर पिक उत्पादन संदर्भात महत्वाची माहिती मोबाईल नेटवर्कच्या माध्यमातुन दिली जाईल.

माहिती तंत्रज्ञानाअंतर्गत मुलभुत पायाभुत सुविधा सामेती आणि आत्मा यांना योजनेअंतर्गत १० व्या पंचवार्षिक योजनेमध्ये देणेत आलेल्या आहेत. हे साहित्य विस्तार कार्यक्रमांसाठी पूर्ण क्षमतेने वापरतात येऊ शकेल.नविन सामेती /आत्मा यांना माहिती तंत्रज्ञान आणि इतर साहित्य AGRISNET/RKVY अंतर्गत खरेदी केले जावू शकते.

तथापी सध्या कार्यरत सामेती/आत्मा माहिती तंत्रज्ञान साहित्य खरेदीसाठीचा निधी खर्च केला नसेल जो मुळ योजनेअंतर्गत अगोदरच दिला आहे. अशी अखर्चित शिल्लक माहिती तंत्रज्ञान साहित्य खरेदीसाठी सद्या मंजुर केलेली AGRISNET प्रकल्प अंतर्गत कॉस्ट नॉर्मसप्रमाणे खरेदी करु शकतात.

सामेती सदस्य (फॅकल्टी), आत्माअंतर्गत अधिकारी, बी.टी.एम. व एस.एम.एस हयांची त्यांच्या संपुर्ण कक्षेत फिरती आवश्यक आवश्यक आहे. सर्व कर्मचा-यारी मोबाईलवर उपलब्ध असायलाच हवेत. बी.टी.एम आणि एस.एम.एस यांचेसाठी त्यांच्या मानधनामध्ये मोबीलीटी आणि कनेक्टीव्हीटी साठी तरतुद करणेत आली आहे.

**कमॉडीटी इंटरेस्ट ग्रुप स्थापना/गठण ( Formation of Comnwdity Interest Group ).**

१) मुख्य घटकांअतर्गत C.I.G स्थापनेस प्रोत्साहन देणेत यावे. एका C.I.G मध्ये २०-२५ शेतकरी असु शकतील.

http://mahaagri.gov.in

२) F.I.G. & C.I.G सदस्यांची बैठक महिन्यातुन किमान एकदा व्हावी. बैठकीत कार्यक्रमा बाबत तथा भविष्यातील कृति संदर्भात चर्चा व्हावी.

३) B.T.T आणि B.F.S.C यांनी नियमितपणे C.I.G च्या कार्यावर संनियत्रण करावे.

४) तालुकास्तरावरील सर्व C.I.G चा तालुका स्तरावर एक गट तयार करावा.

५) C.I.G नी योग्य ते रेकॉर्ड आणि रजिस्टर जतन करणे आवश्यक आहे. (Commodity/Proceedings/Saving/Accounts).

**कृषि चिकित्सालये व कृषि उद्योग केंद्राचा सहभाग वाढविणे.**

१) प्रकल्प संचालक, आत्मा यांनी जिल्हयातील जे कृषि पदवीधर ACABC अंतर्गत प्रशिक्षित झालेले आहेत आणि त्यांनी त्यांचा व्यवसाय सुरु केला आहे, अशांची एक यादी तयार करावी. त्यासाठी मॅनेज वेबसाईट (WWW. agriclinics. net.) चा उपयोग केला जावू शकतो.

२) शेतीशाळा सुलभपणे राबवित असताना आणि प्रशिक्षणात कौशल्यांचे देवाण-घेवाण करणेसाठी शेतकरी मित्राची स्वयंसेवी तज्ञ म्हणुन नियुक्ती केली जावू शकते. ज्या व्दारे विविध कार्यक्रम राबवित असतांना शेतकरी मित्रास मदत होईल.

**कम्युनिटी रेडियो स्टेशनची स्थापना -**

१) सरकारी व निमसरकारी संघटनाबरोबरच खाजगी संस्थानाही कम्युनिटी रेडीओ स्टेशन स्थापनेसाठी निधी दिला जावू शकतो.

२) सामाजिक संघटना, यंत्रणा/स्वायत्त संस्था ज्या सोसायटी नोंदणी कायदा, १८६० नुसार नोंदणीकृत आहेत. अथवा इतर कायद्यानुसार आणि केंद्र सरकार आणि राज्यसरकार यांचे मान्यतेने कृषि व कृषि संलग्न विभागात कार्यरत आहेत उदा. राज्य कृषि विद्यापीठे, कृषि विकास केंद्र हे योजनेअंतर्गत निधी घेणेस प्राप्त आहेत.

३) अर्ज करतेवेळेत संस्था नोंदणीस किमान तीन वर्ष पुर्ण झालेली असावीत.

४) इच्छुक संस्थाकडे मुलभुत पायाभुत सुविधा व सोयी आवश्यक आहेत. किमान ४०० स्वे.फुटची खोली, विज व आवश्यक मनुष्यबळ कम्युनिटी रेडियो स्टेशन चालविणेसाठी आवश्यक आहे.

५) आत्मा व्यवस्थापन समिती योग्य आणि पुरेपुर प्रस्तावाची निवड करेल व राज्य नोडल अधिकारी/कृषि आयुक्तालयास सादर करेल जो नंतर केंद्र शासनास कृषि व सहकार विभागास सादर केला जाईल.

६) प्रकल्प संचालक,आत्मा नियमितपणे CRS च्या कार्याचा आढावा घेतील. त्याच बरोबर आत्मा नियामक मंडळ CRS चा सर्वकष आढावा होईल.ज्यामध्ये साचा तयार करणे (Content Creation) स्थानिक समुदायांचा सहभाग, स्थानिक गरजानुसार नियोजन व निधीचे वितरण/वापर, कृषि विद्यापीठे व कृषि विज्ञान केंद्रे यांचेशी समन्वय इ.

७) CRS निधी वितरणासंबंधी सर्वकष मार्गदर्शक सुचना http://agricoop. nic. in/rediocguidelines. pdf वर उपलब्ध आहेत.

**कॅफेटेरीयामधील सर्वसाधारण घटक :-**

१) कमीत कमी १० टक्के लाभार्थी वाटा/लोकवाटा हा शेतकरी प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, परीसर भेटी आणि शेतकरी समुह क्षमता बांधणी साठी आवश्यक आहे. तथापि, अनु.जाती,अनु. जमाती, महीला लाभार्थी साठी किमान लाभार्थी वाटा ५ टक्के ठेवण्यात आला आहे.

२) किमान ३० टक्के निधी संसाधन महिला कृषि विस्तार कार्यकत्यांसाठी वापरणे गरजेचे आहे. त्यांच्या प्रतिसादाबाबत विशेष यशोगाथा तयार करणेत याव्यात.

३) कृषि विस्तार नियोजन आराखडयामध्ये नमुद केलेल्या बाबी ऐवजी इतर बाबीकरीता खर्च करणेत येवू नये, तथापी तसा खर्च झाल्यास पुढिल वर्षाच्या राज्य वाटयातून सदरील खर्च वजा करणेत यावा.

http://mahaagri.gov.in

४)	आकस्मित खर्च, राज्यस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तर पुढिल प्रमाणे असु शकेल. तांत्रिक सहाय्य, कन्सलटन्सी, विशेष अभ्यास, कार्यशाळा, ग्रंथालय, इंटरनेट, टेलीफोन आणि इतर तसेच तालुका तंत्रज्ञान चमू व शेतकरी सल्ला समीती बैठक, वाहन भाडयाने घेणे, पेट्रोल-आईल - लुब्रीकेअस् खर्च इ.बाबत असू शकेल. (POL)

५)	प्रात्यक्षिके, प्रशिक्षण व परीसर भेटी यांचा उल्लेख आत्मा कॅफेटेरीयामध्ये केलेला नाही. इ. बाबतची तरतूद केंद्र व राज्य सरकारच्या इतर योजनेधुन करु शकतात अन्यथा सदरील बाबतीत आंतरविभागीय कार्यकारी गटाची (IDWG) मान्यता घ्यावी लागेल.

६)	आंतविभागीय कार्यकारी गटाची बैठक (IDWG) कमीत-कमी तीन महीन्यातून एकदा व्हावी.

७)	जिल्हयातील अवर्षन प्रवण क्षेत्रानुसार कार्यक्रमासाठी लागणारा निधी खर्च करणेत यावा.

८)	सुधारीत कॅफेटेरीयामध्ये कृषि व कृषि विकासासंबंधित कृषि प्रदर्शने, कार्यशाळा यासाठी तरतूद करणेत आलेला आहे.

९)	ज्यांचे अनुकरण इतर शेतकरी करु शकतील अशा प्रगतशिल शेतकर्यांरना बक्षिसे देण्याची तरतूदही योजनेमध्ये करणेत आली आहे.ज्यामुळे शेतकर्यां्मध्ये सकारात्मक निकोप स्पर्धा निर्माण होईल व त्यांची उत्पादकता व कार्यक्षमता वाढेल, सदरील अनुकरणीय शेतकर्यां्च्या यशोगाथाही तयार करणेत याव्यात.

**निधी वाटप आणि योजना खर्च**

**-वितरण आणि केंद्र/राज्य हिस्सा :-**

राज्यांना दिला जाणारी आर्थिक तरतुद निवडलेल्या एकुण गट/ब्लॉकच्या प्रमाणात असेल.

निधी सहाय्य पूर्वी प्रमाणेच ९०:१० (केंद्र:राज्य) या प्रमाणे चालू राहिल फक्त शेतकरी मित्र सहाय्य निधीबाबतचे प्रमाण ५०:५० (केंद्र:राज्य) असेल.

**-राज्यानुरुप वितरण :-**

काही राज्यामध्ये खुप छोटे जिल्हे आहेत तर काही राज्यामध्ये खुप मोठे जिल्हे आहेत तथापी गट/ब्लॉकच्या (तालुका) आकारामध्ये राज्यांमध्ये फार मोठी तफावत नाही. म्हणुन योजनेमध्ये उपलब्ध असलेला निधी सुरुवातीला राज्यांतील ब्लॉक/गट/तालुक्यांचे संख्येनुरुप वितरित करणेत आला आहे.

मुलतः राज्यांना प्रत्यक्षात संसाधन वितरण हे मंजुर कृषि आराखडया नुसार, निधीच्या कार्यक्षम वापरानुसार, व भौतिक प्रगतीनुसार केले जाईल.

**राज्यांना चांगल्या कार्यासाठी बक्षिसे (Incentives)**

राज्ये आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला सर्व समावेशक प्रकल्प तथा कार्यक्रम आराखडा तयार करुन कृषि विभागास सादर करु शकतात.

चांगली कामगिरी करणा-या राज्यांना त्यांनी सादर केलेल्या मंजुर कार्यक्रमांच्या कृति आराखडयाच्या जास्तीचे निधी वितरण करुन उत्तेजन दिले जावू शकते.

तथापी संभाव्य वितरणाच्या जास्तीचे निधी वितरण हे एकुणच योजनांच्या अंमलबजावणीच्या प्रगतीवर व केलेल्या खर्च तपशिलावर आणि सुधारीत आत्मा योजनेच्या अंतर्गत उपलब्ध असलेल्या निधीवर अवलंबुन असेल.

अधिकचे निधी वितरण हे प्रथम येणा-यास प्राधान्य (First come first served basis ) यावर अवलंबुन असेल. राज्यांनी त्यांना केंद्र सरकारने कृषि विभागाने उपलब्ध केलेल्या निधीच्या जास्तीचे खर्च करु नयेत. अशा प्रकारचा कुठलाही प्रस्ताव ज्यामध्ये मागील व केंद्र सरकारने उपलब्ध केलेल्या निधीच्या पेक्षा जास्त खर्च केला असेल व पुढील आर्थिक वर्षामध्ये त्याबाबत मागणी केली असल्यास कृषि व सरकार विभाग जबाबदार असणार नाही. तथापी असा प्रस्ताव पूर्ण पणे नाकारला जाईल.

http://mahaagri.gov.in

**निधी वाटप**

- निधीचे वितरण अंमलबजावणी यंत्रणेस पेरणी हंगाम सुरु होण्यापूर्वी साधारणपणे दोन हस्यामध्ये वितरित केला जाईल.
- पहिला हप्ता SEWP च्या मंजुरीनंतर आणि भौतिक/आर्थिक अहवाल सादर केल्यानंतर आणि मागील वेळी वितरित केलेल्या निधीचे Provisionel UC सादर केल्या नंतर वितरित केला जाईल.
- अखर्चित शिल्लक पुढील वर्षी वितरित केलेल्या निधी मध्ये समाविष्ट (Adjust) करता येवू शकेल.
- राज्यांनी निधी संदर्भात लेखी मागणी केद्रांस सादर करणे आवश्यक आहे.

**दुस-या हस्याचे वितरण खालील बाबीचे वितरण केल्यानंतर होवू शकेल.**

१) मागील वर्षीचे Provisionel UC.

२) Provisional AUC and SoE (Audited Utilization Certificates & Audited Statement of Expenditure for the year before last)

३) मागील वर्षांचा वार्षिक प्रगती अहवाल.

४) मागील वर्षा पर्यंत केंद्र हिस्सांच्या प्रमाणात तरतुदीनुसार राज्य हिस्सा वितरण.

राज्यांनी जिल्हयांना निधी वितरित करतांना उत्कृष्ट अंमलबजावणी साठी निश्चित वेळ ठरविणे आवश्यक आहे. (कृषि व सहकार विभागाकडून निधि प्राप्त झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत)

जिल्हयांनी निधी प्राप्त झालेनंतर १० दिवसांचे आत संलग्न विभागांना निधी वितरित करणे आवश्यक आहे.

**सनियंत्रण आणि मुल्यमापन**

योजनेतील कार्यक्रमांचे ठराविक कालावधीनंतर सनियंत्रण आणि मुल्यमापन वेगवेगळया स्तरावर निर्माण करणेत आलेल्या कार्यप्रणालीव्दारे केले जाते. उदा. तालुकास्तर, जिल्हास्तर, राज्यस्तर आणि राष्ट्रीयस्तर.

तालुकास्तरावरील सनियंत्रण व मुल्यमापन बीएफएसी आणि बी.टी.टी. व्दारे तर जिल्हा स्तरावरील आत्मा नियामक मंडळाव्दारे केले जाईल.

राज्यस्तरिय अनुज्ञा समीती RKVY अंतर्गत DAP प्रमाणेच SEWP मंजुरी देईल व नियमितपणे सनियंत्रण करेल. आंतरविभागीय कार्यकारी गट, योजनेच्या दैनंदिन कामे विस्तार विषयक सुधारणा कार्यक्रम धोरणात्मक निर्णयानुसार चालु आहे का? याबाबत संनियंत्रणाचे काम चालु ठेवेल.

अतिरिक्त सचिव, कृषि व सहकार विभाग, केंद्र सरकार व राष्ट्रीय स्तरावरील, सचिव कृषि व सहकार विभाग यांचे अध्यक्षते खालील धोरणात्मक कमिटी राष्ट्रीय स्तरावर नियमितपणे आढावा, सनियंत्रण आणि योजना अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शन करेल.

जिल्हयांचा मासिक व त्रैमासिक आढावा प्रकल्प संचालक आत्मा यांना उपलब्ध केलेल्या web.based inler face मध्ये http://dacnet. nic. in/exlension reforms. यावर पुढील महिन्याच्या ५ तारखेस करावे. तर सर्व जिल्हयांना Data भरल्याची खात्री केल्यानंतर, राज्य नोडल अधिकारी १० तारखेस संपूर्ण राज्याचा Data भरतील करतील. सर्व Data इलेक्ट्रॉनिक पध्दतीनेच भरला जावा कुठल्याही परिस्थितीत कागदी अहवाल (Paper Report) दिला जावू नये.

वरील प्रमाणे MIS नियोजना प्रमाणे कार्यवाही झाली नाही तर राज्यांना पुढील निधी वितरित केला जाणार नाही.

आंतर विभागीय कार्यकारी गट, योजनेचे कार्यक्षम सनियंत्रण व मुल्यमापन करणेसाठी प्रकल्प क्षेत्रामध्ये नियमित प्रक्षेत्र भेटी अहवाल, चर्चा, परिसंवाद इ. घेतील.

तृतीय पक्षांच्या (Third Party) वतीने सनियंत्रण व मुल्यमापन करणेसाठी योजनेमध्ये तरतुद करणेत आलेली आहे.

तृतीय पक्षाच्या (Third Party) वतीने होणारे मुल्यमापन वार्षिक असावे व सदरील अहवाल कृषि व सहकार विभाग, केंद्र सरकार यांना पाठविण्यात यावा.

http://mahaagri.gov.in

कृषि व सहकार विभाग केंद्र सरकार हे ही मुल्यमापन व सनियंत्रण करतील तसेच योजनेच्या प्रभावा (Impact) बाबत अवलोकन करतील.

याव्यतिरिक्त योजनेतील सर्व कार्यक्रमांचा आढावा राष्ट्रीय स्तरावरील त्रैमासिक बैठकीत घेणे चालु राहिल.

तालुकास्तरावर एस.एम.एस., शेतीशाळा, प्रात्यक्षिक प्लॉट, प्रशिक्षणे, प्रक्षेत्र भेटी आणि शेतकरी मित्रांच्या कामाचे संनियंत्रण माहिती आणि संवाद तंत्रज्ञानाच्या (ICT) माध्यमातुन आणि बैठकांच्या माध्यमातुन बी.टी.टी. करेल, तसेच जिल्हा स्तरावर आत्मा तर राज्यस्तरावर SLSC सनियंत्रण करेल.

आंतविभागीय कार्यकारी गट:- १) आंतर विभागीय कार्यकारी गटाची बैठक **(IDWG)**

| अ.क्रं. | सन २०१०-११ मध्ये सुधारीत आत्मा योजनेच्या केलेल्या समित्यांचा तपशील | |
|---|---|---|
| | पदनाम | हुद्दा |
| १ | कृषि उत्पादन आयुक्त/प्रधान सचिव (कृषि) | चेअरमन |
| २ | सचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| ३ | सचिव (फलोत्पादन विभाग) | सदस्य |
| ४ | सचिव (पशुसंवर्धन) | सदस्य |
| ५ | सचिव (ग्रामिण विकास) | सदस्य |
| ६ | सचिव (मत्स्यव्यवसाय) | सदस्य |
| ७ | सचिव (मृद संधारण) | सदस्य |
| ८ | सचिव (महिला व बालकल्याण) | सदस्य |
| ९ | सचिव संलग्न विभागाचे (आवश्यकतेप्रमाणे) | सदस्य |
| १० | कुलगुरु कृषि विद्यापीठ | सदस्य |
| ११ | संचालक, ICAR राज्यातील संस्था | सदस्य |
| १२ | राज्यस्तरावरील अधिकारी नाबार्ड संस्था | सदस्य |
| १३ | संचालक, दुरदर्शन | सदस्य |
| १४ | संचालक, आकाशवाणी | सदस्य |
| १५ | कृषि संचालक, (विस्तार व प्रशिक्षण) | सदस्य सचिव |

**टिप-** १) ज्या विभागामध्ये उदा. फलोत्पादन, मृदसंधारण इ. जेथे वेगळे सचिव पद नसतील अशा ठिकाणी संबंधित विभागातील संचालक आंतरविभागीय कार्यकारी गटाचे प्रतिनिधीत्व करतील

२) आंतरविभागीय कार्यकारी गटाची बैठक तीन महिन्यातून एकदा होईल

**आंतविभागीय कार्यकारी गटाची कार्ये :-**

१) राज्य कृषि विस्तार कृति आराखडा शिफारस तथा मंजूरीसाठी राज्यस्तरीय अनुज्ञा समितीसमोर किंवा तांत्रिक विभाग कृषि व सहकार विभाग यांचे समोर ठेवणे.

२) राज्य मुख्यालय कक्षाचे संनियंत्रण तथा सहाय्य करणे यामध्ये वेळेवर प्रस्तावांची मंजूरी घेणे व पुढिल कार्यवाही करणे इ.चा समावेश होतो.

३) राज्य शासनाअंर्तगत कृषि संलग्न विभाग,संशोधन क्षेत्र आणि केंद्राच्या कृषि व सहकार विभागामध्ये समन्वयक कार्यप्रणाली विकसित करणे.

४) मानव संसाधन विकास/क्षमता विकासाबाबत राज्य स्तरीय समीती/कार्यकारी समीती, सामेतीस मार्गदर्शन करणे.

५) चेअरमन, आत्मा नियामक मंडळ यांना दैनंदिन आत्मा कार्यक्रम राबविणेबाबत मार्गदर्शन करणे.

http://mahaagri.gov.in

६) मास मिडीया योजनेअंर्तगत स्थापन झालेल्या राज्यस्तरीय समीतीस मास मिडीयाच्या मदतीने माहिती प्रसारीत करणेसंबंधी मार्गदर्शन करणे.

७) आवश्यकता व गरजेनुरुप वेळोवेळी उत्पन्न झालेल्या इतर धोरणात्मक मुद्यासंदर्भात मार्गदर्शन करणे.

**२) आत्मा नियामक मंडळ (GB) :-**

जिल्हा स्तरावरील नियामक मंडळ (GB)

| अ.क्रं. | सन २०१०-११ मध्ये सुधारीत आत्मा योजनेच्या केलेल्या समित्यांचा तपशील | |
|---|---|---|
| | पदनाम | हुद्दा |
| १ | जिल्हाधिकारी/जिल्हा दंडाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद | उपाअध्यक्ष |
| ३ | सहसंचालक/उपसंचालक (कृषि) | सदस्य |
| ४ | सहसंचालक/उपसंचालक (फलो) | सदस्य |
| ५ | सहसंचालक/उपसंचालक (पशुसंवर्धन/मत्स्यव्यवसाय/रेशीम) | सदस्य |
| ६ | प्रादेशिक संशोधन केंद्राचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र | सदस्य |
| ८ | शेतकरी प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | शेतकरी प्रतिनिधी (पशूधन) | सदस्य |
| १० | शेतकरी प्रतिनिधी (फलोत्पादन) | सदस्य |
| ११ | शेतकरी महिला प्रतिनिधी (FIGs) | सदस्य |
| १२ | अशासकिय संस्था प्रतिनिधी (NGO) | सदस्य |
| १३ | प्रतिनिधी (जिल्हा अग्रणी बॅक) | सदस्य |
| १४ | प्रतिनिधी (जिल्हा उद्योग केंद्र) | सदस्य |
| १५ | प्रतिनिधी (कृषि पणन मंडळ) | सदस्य |
| १६ | प्रतिनिधी (निविष्ठा पुरवठादार संस्था) | सदस्य |
| १७ | प्रतिनिधी (निविष्ठा वितरक ) | सदस्य |
| १८ | प्रतिनिधी (मत्स्यव्यवसाय/रेशीम) विभाग | सदस्य |
| १९ | प्रतिनिधी (DRDA) | सदस्य |
| २० | प्रकल्प संचालक आत्मा | सदस्य सचिव |

**टिप-**

१) कृषि व सहकार विभा्गास पुर्वसुचना देवून राज्य आत्मा नियामक मंडळाच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परीषद,मुख्य विकास अधिकारी/अतिरीक्त जिल्हाधिकारी दर्जा पेक्षा खाली नसणार्या इतर विभागतील कर्मचार्यांंची नेमणूक करु शकते.

२) राज्य - गरज असेल तेथे अधिकचे स्विकृत सदस्य घेवू शकतात.

३) सर्व शेतकरी प्रतिनिधी बहुमताने जिल्हा शेतकरी सल्ला समितीने नामांकीत केलेले असावेत.

**नियुक्ती/नामांकन/सदस्यांचा कालावधी :-**

१) आत्मा नियामक मंडळातील अधिकार्यारव्यतिरीक्त इतर सदस्यांची नियुक्ती अध्यक्ष,आत्मा नियामक मंडळ यांचे शिफारशीनुसार मुख्य कृषि सचिव यांनी दोन वर्षासाठी करावी.

http://mahaagri.gov.in

२) सुरुवातीला कमीत कमी दोन तृतीअंश सदस्यांना पुढे संधी देणेत यावी व भविष्यात कमीत कमी दोन तृतिअंश सदस्य जुने राहतील याबाबत नियोजन करावे.
३) आत्मा नियामक मंडळामध्ये ३० टक्के महिलांना प्रतिनिधीत्व मिळावे.

**आत्मा नियामक मंडळाची मुख्य कार्ये :-**

१) यथार्थ कृषि संशोधन व विस्तार नियोजन SREP आढावा घेणे व मंजूरी देणे आणि सहभागी एककांनी सादर केलेल्या वार्षिक नियोजनास मंजूरी/परवानगी देणे.
२) जिल्हयाअंर्तगत विविध एककांनी राबविलेल्या कृषि संधोधन व विस्तार कार्याचा अहवाल घेणे, त्यांचा आढावा घेणे, गरजेनुसार त्यांना मार्गदर्शन व दिशा देणे.
३) जिल्हयाअंर्तगत संशोधन विस्तार आणि इतर कार्यक्रमांअंर्तगत निधी स्विकारणे व प्रकल्पानुसार वाटप करणे.
४) शेतकरी समुह विकास व शेतकरी संघटना बांधणीसाठी प्रोत्साहन देणे.
५) शेतकर्यांरना निविष्ठा,तांत्रिक सहाय्य,कृषि प्रक्रिया आणि पणन सेवा देण्यासाठी खाजगी क्षेत्रांना व संघटनांना जास्तीत जास्त सहभाग वाढविणेसाठी प्रोत्साहन देणे.
६) सिमांत शेतकरी, अनु. जाती व अनु. जमातीतील शेतकरी, महिला शेतकरी यांना कृषि पतपुरवठादार संस्थांनी जास्तीत जास्त मदत देणेसंबंधी प्रोत्साहन देणे.
